अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । मंगळवार
१८.०८.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
वर्ष: ०७ | अंक: १९९ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
+91 7745067712

# दोन वर्षांत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सिंगापूर आणि 'यूएई'ला मागे टाकेल

**मुख्यमंत्री यांचा विश्वास : अमेरिकेतील कंपन्यांकडून गुंतवणुकीचा ओघ वाढणार**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – 'राज्याचा आर्थिक विकास वेगाने होत असून, सद्यस्थितीत सुरू असलेला विकासाचा वेग पाहता आगामी दोन वर्षांत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था सिंगापूर आणि युएई या देशांच्या अर्थव्यवस्थेलाही मागे टाकेल', असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी व्यक्त केला. मुंबईत इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सच्या राष्ट्रीय अधिवेशनानंतर माध्यमांशी संवाद साधताना ते बोलत होते.

मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, जर महाराष्ट्र हा एक स्वतंत्र देश असता, तर तो जगातील विसाव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरला असता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाची अर्थव्यवस्था वेगाने पुढे जात असून, त्यात महाराष्ट्र अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे.

याच जोरावर आगामी दोन वर्षांत राज्याचा जीडीपी सिंगापूर आणि युएईसारख्या अर्थव्यवस्थांच्या पुढे जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. इंडो-अमेरिकन चेंबर ऑफ कॉमर्सच्या राष्ट्रीय अधिवेशनाला संबोधित करताना आणि भारतामधील अमेरिकेचे राजदूत सर्जियो गोर यांच्याशी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत तंत्रज्ञान, उच्च शिक्षण, सेमीकंडक्टर, डेटा सेंटर आणि डीप टेक या क्षेत्रांतील गुंतवणुकीवर सविस्तर चर्चा झाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. अमेरिकेतील कंपन्यांची महाराष्ट्रासोबत भागीदारी करून येथे एक मोठी औद्योगिक परिसंस्था विकसित करण्याची इच्छा असून, यासंदर्भातील चर्चा अत्यंत सकारात्मक आणि फलदायी ठरल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, पुणे मेट्रोच्या बहुतांश काम पूर्ण होत आले असून, लवकरच या प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात येणार आहे. या उद्घाटनासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण देण्यात आले असून ते उपस्थित राहतील, अशी आशा मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

# विकसित भारतासाठी बँकिंग! उच्चस्तरीय समिती स्थापन करणार

**अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांची घोषणा**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**नवी दिल्ली** – विकसित भारताच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्यास सक्षम असणाऱ्या बँकांची निर्मिती करण्यासाठी एक आराखडा तयार करण्याच्या उद्देशाने, 'विकसित भारतासाठी बँकिंग' या विषयावर सरकार लवकरच एक उच्चस्तरीय समिती स्थापन करेल, असे केंद्रीय अर्थमंत्री सीतारामन यांनी सोमवारी सांगितले.

अर्थसंकल्पात अर्थमंत्र्यांनी या क्षेत्राचा सर्वसमावेशक आढावा घेण्यासाठी आणि भारताच्या विकासाच्या पुढील टप्प्याशी बँकिंग क्षेत्राला सुसंगत बनवण्यासाठी 'विकसित भारतासाठी बँकिंग' विषयावर उच्चस्तरीय समितीचा प्रस्ताव मांडला होता.

येथे आयोजित दोन दिवसीय 'पीएसबी कॉन्फ्लुएन्स'ला संबोधित करताना सीतारामन म्हणाल्या, आज आणि उद्या होणारी ही सखोल चर्चा अशा वेळी होत आहे, जेव्हा विकसित भारतासाठीच्या बँकिंग क्षेत्राची पाहणी करणाऱ्या उच्चस्तरीय समितीची घोषणा अपेक्षित आहे. ही समिती लवकरच जाहीर केली जाईल.

पीएसबी परिषदेत १२५ प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. यामध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे अध्यक्ष, व्यवस्थापकीय संचालक आणि कार्यकारी संचालक यांच्यासह खालील प्रमुख वित्तीय संस्थांचे अधिकारी आणि वित्तीय सेवा विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित आहेत.

**बँकांनी गती टिकवून ठेवावी**

कार्यक्रमात वित्तीय सेवा सचिव संजय लोहिया म्हणाले की, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी विशेषतः वाढत्या स्पर्धेच्या काळात आपली सध्याची कामगिरी आणि गती टिकवून ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तंत्रज्ञान हे व्यवसाय पद्धती बदलत आहे. ग्राहकांचे अनुभव समृद्ध होत आहेत आणि आर्थिक उपक्रमांचे नवीन क्षेत्र वेगाने उदयाला येत आहेत, असे ते म्हणाले.

**बिगर-व्यवहारी मालमत्तांची पातळी नीचांकी स्तरावर**

२०४७ च्या विकसित भारताचे ध्येय प्रत्यक्षात फार दूर नाही यावर भर देत अर्थमंत्री म्हणाल्या, तुमच्या बिगर-व्यवहारी मालमत्तांची पातळी ही भारतीय बँकिंग क्षेत्राच्या इतिहासातील सर्वात नीचांकी स्तरावर आहे. त्यामुळे बँकिंग क्षेत्रात महत्त्वाच्या सुधारणा घडवून आणण्यासाठी यापेक्षा अधिक मजबूत आणि योग्य वेळ असू शकत नाही. १ फेब्रुवारी रोजी दिलेल्या अर्थसंकल्पीय भाषणात, 'विकसित भारतासाठी बँकिंग उच्चस्तरीय समिती' स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडते, अशी घोषणा सीतारामन यांनी केली होती.

## थोडक्यात

### क्रेन कोसळून दोन कामगारांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** -ऐरोली येथील पटणी रोड येथे बांधकाम सुरू असलेल्या बांधकाम साइटवरील बांधकाम साहित्य वाहून नेणाऱ्या क्रेनचा हुक तुटून तो खाली काम करणाऱ्या दोन कामगारांवर पडल्याची दुर्घटना सोमवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घडली. या दुर्घटनेत दोन्ही कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पटणी रोडवरील रहेजा बिल्डरच्या गीगा फ्लेक्स कंपनीच्या वतीने इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सोमवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास या बांधकाम साइटवरील बांधकाम साहित्य वाहून नेणाऱ्या क्रेनचा हुक अचानक तुटला. त्यामुळे ही क्रेन तुटून खाली काम करत असलेल्या बॉबी राय (४१) व राहुल मिश्रा (३३) यावर कोसळला.

# मुख्यमंत्र्यांना मंत्र्यांचा निर्णय बदलण्याचा अधिकार

**महाराष्ट्र शासनाच्या नियमांत महत्त्वाचा बदल**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्राच्या प्रशासकीय व्यवस्थेत महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. राज्य सरकारने 'महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम, २०२६' अधिसूचित बदल केले असून, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने एखाद्या मंत्र्याने घेतलेल्या निर्णयात मुख्यमंत्री हस्तक्षेप करू शकतील, अशी तरतूद करण्यात आल्याचे समोर आले आहे.

या बदलामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मंत्रिमंडळातील विविध खात्यांच्या निर्णयांवर अधिक प्रभावीपणे देखरेख ठेवण्याची भूमिका मिळणार आहे. महाराष्ट्र शासन कार्यपद्धती नियम हे संविधानाच्या कलम १६६ अंतर्गत राज्याच्या प्रशासकीय कामकाजाची चौकट निश्चित करतात सार्वजनिक हितासाठी निर्णय बदलण्याची तरतूद : नव्या नियमांनुसार, सार्वजनिक हिताचा विचार करून मुख्यमंत्र्यांना एखाद्या मंत्र्याने घेतलेल्या निर्णयात बदल करण्याचा अधिकार देण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र, असा निर्णय बदलताना मुख्यमंत्र्यांना आपली भूमिका लेखी स्वरूपात नोंदवावी लागणार आहे. दरम्यान, संबंधित विभागाच्या दैनंदिन आणि प्राथमिक कामकाजाची जबाबदारी त्या विभागाच्या मंत्र्याकडेच राहणार आहे. त्यामुळे मंत्र्यांचे विभागीय अधिकार पूर्णपणे काढून घेण्यात आलेले नसून, सार्वजनिक हिताच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर मुख्यमंत्र्यांना हस्तक्षेपाची तरतूद करण्यात आली आहे.

मुख्यमंत्र्यांना कागदपत्रे मागवण्याचा अधिकार : नव्या कार्यपद्धतीत मुख्यमंत्री आणि मंत्र्यांसोबतच मुख्य सचिव तसेच इतर सचिवांच्या कामकाजाबाबतही स्पष्टता देण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

# विनोद तावडेंवर मोठी जबाबदारी : उत्तर प्रदेशच्या प्रभारीपदी नियुक्ती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** – भारतीय जनता पक्षाने आपल्या संघटनेत मोठे फेरबदल करताना पक्षाचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्याकडे उत्तर प्रदेशच्या राज्य प्रभारीपदाची अत्यंत महत्त्वाची जबाबदारी सोपवली आहे. कालच भाजपची नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर झाली होती. त्यानंतर लागलीच तावडे यांच्यावर देशातील राजकीयदृष्ट्या सर्वात महत्त्वाचा मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेश राज्याचे प्रभारी म्हणून शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

**२०२७ च्या विधानसभा निवडणुकीआधी भाजपचा 'मास्टरस्ट्रोक'**



आगामी २०२७ मधील उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. यासोबतच पक्षाने इतर राज्यांमध्येही प्रमुख नियुक्त्या केल्या असून, तरुण चुग यांच्याकडे गुजरातची तर सतीश पुनिया यांच्याकडे पंजाबची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. विनोद तावडे यांचा राजकीय प्रवास आणि प्रमुख यशस्वी मोहिमा- २०२२ च्या राष्ट्रपतीपद निवडणुकीत एनडीएच्या उमेदवार श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्या निवडणूक प्रभारी म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली, विविध राज्यांमधील बैठकांचे यशस्वी समन्वय केले आणि एनडीए मित्रपक्षांना व पाठिंबा देणाऱ्या पक्षांना एकत्र आणण्यात सक्रिय भूमिका बजावत निर्णायक पाठबळ मिळवून दिले.

त्यानंतर २०२५ च्या उपराष्ट्रपतीपद निवडणुकीत एनडीएचे उमेदवार श्री सी.पी. राधाकृष्णन यांच्या निवडणूक प्रभारीपदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली, जिथे त्यांनी एनडीए मित्रपक्ष व पाठिंबा देणाऱ्या पक्षांमधील समन्वय केला. २०२० मध्ये हरियाणाचे राज्य प्रभारी म्हणून त्यांची नियुक्ती झाली, जिथे पक्ष संघटन बळकट करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# दारु पिऊन वर्गात झोपणारा तो मुख्याध्यापक अखेर निलंबित : दिपकेंच्या दौऱ्यापूर्वीच निलंबन, तरीही दिपके बसले आंदोलनाला

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**हिंगोली** – कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी स्कूल ठीक करो या या कॅम्पेनिंगची सुरुवात हिंगोली जिल्ह्यामधून केली होती. हिंगोली जिल्ह्यातील विविध शाळांना भेट देत शाळांची दुरावस्था त्यांनी दाखवली होती. याच दरम्यान त्यांनी हिंगोली जिल्ह्यातल्या जिल्हा परिषद शाळा लिंबाळा या शाळेला भेट दिली होती, या शाळेमध्ये मुख्याध्यापकच भर दिवसा शाळेमध्ये दारू पिऊन राहतो असं निदर्शनास आलं होतं, संबंधित मुख्याध्यापक विनोद कटके हा शाळेतच दारू पीत असल्याचे व्हिडिओ अभिजीत दिपके यांनी समोर आणले होते आणि या शिक्षकावर कारवाई करा, अन्यथा मंगळवारी आंदोलन केलं जाईल असा इशारा दिपके यांनी दिला होता. अखेर अभिजीत दिपके हिंगोली जिल्ह्यामध्ये दाखल होण्यापूर्वीच काल संबंधित मुख्याध्यापक विनोद कटके याला निलंबित करण्यात आले आहे, तसे आदेश हिंगोली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी काढले आहेत.



### ॲड.अंकिता जैस्वाल यांच्या प्रभावी युक्तिवादाने

# गुन्हयातील आरोपीला जामीन : न्यायालयीन युक्तिवादाला यश

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – बी.एन.एस.कलम १०८, ६४ (२), ३ (५) तसेच पोस्को कलम ४ अंतर्गत दाखल गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यात आरोपी भुषण यास न्यायालयाने जामीन मंजुर केला. सदर प्रकरणात आरोपीच्या बाजुने ॲड.अंकिता जैस्वाल यांनी प्रभावी व कायदेशीर मुद्द्यांच्या आधारे यशस्वीपणे युक्तिवाद केला. आरोपीविरुद्ध लावण्यात आलेल्या आरोपांच्या पार्श्वभुमीवर उपलब्ध कागदपत्रे, पुराव्यांचे स्वरुप, तपासाची स्थिती तसेच जामीन देण्यासंदर्भातील कायदेशीर बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणुन देण्यात आल्या. ॲड.अंकिता जैस्वाल यांच्या प्रभावी युक्तिवादामुळे आरोपी भुषण यास न्यायालयाकडुन जामीन मिळवुन देण्यात यश आले. या युक्तिवादात ॲड.अनिल घाटोळे व ॲड.यश पाटणकर यांनीही महत्त्वपुर्ण सहकार्य केले. गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यात कायदेशीर बाबींचा बारकाईने अभ्यास करुन प्रभावीपणे बाजु मांडत आरोपीस जामीन मिळवुन देण्यात ॲड.अंकिता जैस्वाल यांच्या कायदेशीर कौशल्याचे विशेष महत्त्व राहिले.

# केंद्रीय मंत्रिमंडळाचा लवकरच विस्तार : रामदास आठवले

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नागपूर** – केंद्रीय मंत्रिमंडळाचा विस्तार लवकरच होण्याची शक्यता असून, यामध्ये भारतीय जनता पक्ष आणि मित्रपक्ष असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नवीन चेहऱ्यांना संधी दिली जाऊ शकते, असा दावा केंद्रीय मंत्री आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे (आठवले) प्रमुख रामदास आठवले यांनी केला आहे. यावेळी आठवले यांनी शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला आपले वैचारिक मतभेद बाजूला ठेवून विकासाच्या प्रक्रियेला गती देण्यासाठी सत्ताधारी 'राष्ट्रीय लोकशाही आघाडी'मध्ये (एनडीए) सामील होण्याचे आवाहन केले. फेरबदल लवकरच भाजपच्या संघटनात्मक बदलांनंतर केंद्र सरकारमध्ये लवकरच मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो, ज्यामध्ये भाजप आणि राष्ट्रवादीच्या नव्या नेत्यांना स्थान मिळण्याची शक्यता आहे. शरद पवार यांनी स्वतः एनडीएत येण्यास नकार दिला, तरी त्यांच्या पक्षाच्या आठ खासदारांनी देशाच्या विकासासाठी एनडीएचा भाग झाले पाहिजे, असे विधान आठवले यांनी केले.

### महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयातील

# वाणिज्य व व्यवसाय विभाग यांच्यामध्ये सामंजस्य करार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचालित स्थानिक महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालय येथील वाणिज्य व व्यवसाय विभाग यांच्यामध्ये सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सीए फाऊंडेशन, सीएस परीक्षांचे नियोजन, अभ्यासक्रमाची माहिती, परीक्षेची तयारी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सराव परीक्षा तसेच विविध कौशल्यविकास उपक्रमांचा लाभ मिळणार आहे.

विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने हा करार अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. महाविद्यालयातच सीए आणि सीएस संबंधित कोर्सेस परीक्षा अकॅडमी मार्फत घेण्यात येणार आहेत तसेच यामुळे अनुभवी व तज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शनासाठी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, अशा अभिनव उपक्रमाबद्दल प्राचार्य डॉ.दिलीप हांडे यांनी स्वागत करुन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या कोर्सेसला प्रवेश घेऊन उपलब्ध संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिलीप हांडे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.माधुरी उमेकर, डॉ.गणोरकर, डॉ.कोंडुलकर तसेच परीक्षा अकॅडमी बिलासपूरचे प्रतिनिधी साहिल शर्मा उपस्थित होते.

या सामंजस्य करारामुळे तालुक्यातील विद्यार्थ्यांना बाहेर कोठेही न जाता तसेच कमी खर्चात वरील कोर्सेस करता येणार आहे तसेच विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळुन आत्मविश्वासात वाढ होण्यास मदत होणार आहे.

### न्यायालयीन कामकाज समजुन घेण्याकरीता

# स्कूल ऑफ स्कॉलर्सचे विद्यार्थी पोहचले कोर्ट रूममध्ये

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – विद्यार्थ्यांना भारतीय न्यायव्यवस्थेची प्रत्यक्ष ओळख करून देणे न्यायालयीन प्रक्रिया समजून घेणे तसेच कोर्ट रूम मधील कार्यपद्धतीचा अनुभव देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या डेहली पब्लिक स्कूल लावा अदालत या विशेष स्पर्धेत स्कूल ऑफ स्कॉलरच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

दरवर्षी आयोजित करण्यात येणाऱ्या या स्पर्धेत सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग होता. यावर्षी अर्णव अंधारे, मधुरा खेरडे, रिधान महाजन, आराध्य भोगे, आरणा धरमठोक, अर्णव आटलोये, अर्णव जैन, स्मृती जटाले, अनिश वानखडे, मोईन खान, झोफीशा काझी, अरहमखान, आर्यन पाटील, रितुल देशमुख,आदिती बिजवे, युक्ती भोर, अस्मिता चौधरी, देविका वाघ, अक्षरा चौधरी, उमंग बावनकर, आराध्य वानखडे, भक्ती यावलकर, मैथिली वैद्य, आनंद चोचमकर, शांतनु अनासाने आणि साहिल ठाकरे या २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या स्पर्धे दरम्यान विद्यार्थ्यांना भारतीय न्यायव्यवस्थेची रचना न्यायालयीन प्रक्रिया न्यायालयीन विविध भूमिका तसेच कोर्टमध्ये सेशनची कार्यपद्धती याबाबत मार्गदर्शन मिळाले. या स्पर्धेत अर्णव जैन आणि आनंद चोचमकर यांनी उल्लेखनीय कामगिरी बजावली.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी केंद्रीय मंत्री नितीनजी गडकरी उपस्थित होते त्यांच्या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांना न्यायव्यवस्था जबाबदार नागरिकत्व आणि समाज समाजाप्रती असलेल्या कर्तव्य विषयी मौल्यवान विचार ऐकण्याची संधी मिळाली. स्कूल ऑफ स्कॉलर्स ही संस्था विद्यार्थ्यांना सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक सामाजिक आणि स्पर्धात्मक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांना सहभागी घेण्या होण्यासाठी सातत्याने प्रोत्साहीत करते विद्यार्थ्यांना अशा उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध करून दिल्याबद्दल विद्यार्थ्यांनी प्राचार्य सुनीत दुबे यांचे आभार मानले.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य रिया तडके आणि स्वाती निकम यांनी विद्यार्थ्यांचा मार्गदर्शन केले.

### स्व.पंचफुलाबाई पावडे, कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या

# प्रवेशित विद्यार्थिनींसाठी दीक्षारंभ व प्रज्ञाशोध कार्यक्रम



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्व.पंचफुलाबाई पावडे, कला व वाणिज्य महिला महाविद्यालयाच्या आयक्यूएसी द्वारा बी.ए. भाग १ च्या प्रवेशित विद्यार्थिनींसाठी दीक्षारंभ व प्रज्ञाशोध कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले .

कार्यक्रमाच्या सुरुवात माँ सरस्वती व गाडगे बाबांच्या प्रतिमांचे पुजन व दीप प्रज्वलनाने तसेच विद्यापीठ गीताने झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.साजिद अन्वर यांनी भुषविले तर व्यासपीठावर प्रा.अरविंद तट्टे, डॉ.विवेक देशमुख, डॉ.अनिल कडु, डॉ.प्रदीप ढोले, डॉ.मनोज राठोड, डॉ.लिना गावंडे, डॉ.फरहीना शिरीन, डॉ.कविता इंगळे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रा.अरविंद तट्टे यांनी नवीन शैक्षणिक धोरणावर विस्तृत प्रकाश टाकला. सर्व विभागप्रमुखांनी अभ्यासक्रम तसेच महाविद्यालयात वर्षभरात संपन्न होणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रम, रा.से.यो.शिबिर, ग्रंथालय उपक्रम, विद्यापीठ युवा महोत्सव इत्यादी बाबत विस्तृत माहिती विद्यार्थीनींना दिली. प्रशांत इंगळे यांनी शासनाच्या वेगवेगळ्या शिष्यवृत्ती योजनांची माहिती दिली.प्राचार्य डॉ.साजिद अन्वर यांनी नवीन शैक्षणिक धोरणात नेमून दिलेल्या अभ्यासक्रमाचे विद्यार्थिनींनी महाविद्यालयात नियमितपणे येऊन अध्ययन करुन तसेच वर्षभरामध्ये संपन्न होणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवुन आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करून घेण्याच्या आव्हान विद्यार्थिनींना याप्रसंगी केले.

याप्रसंगी महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी व बी.ए.भाग १ च्या विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर सादरीकरणाने परिसर दुमदुमला

### विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव




**वरुड** – येथील न्यू ऑरेंज सिटी कॉन्व्हेंटमध्ये भारताचा ७९ वा स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात आणि देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला विविध क्षेत्रांतील मान्यवर, विद्यार्थी, पालक तसेच शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी जायंट्स ग्रुप वरुडचे अध्यक्ष विजय गुल्हाने आणि पंचायत समिती वरुडचे निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे होते. प्रमुख अतिथी विजय गुल्हाने यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय गीत, राष्ट्रगीत तसेच राज्यगीत अभिनव पद्धतीने सादर केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या 'वंदे मातरम' या गीताने संपूर्ण शाळेचा परिसर देशभक्तीच्या भावनेने भारावून गेला.

स्वातंत्र्य दिनानिमित्त इयत्ता आठवीची विद्यार्थिनी आर्या सुधीर कानूगो हिने प्रभावी भाषणातून देशभक्तीपर विचार व्यक्त केले. कार्यक्रमात विविध स्पर्धा व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गुणगौरव करण्यात आला.

कर्नाटक येथे झालेल्या आर्चरी स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात सुवर्णपदक मिळिवणाऱ्या विद्यार्थ्यांचा, चंद्रपूर येथे झालेल्या हॉलीबॉल स्पर्धेत रौप्यपदक मिळिवणाऱ्या विद्यार्थ्यांचा तसेच खासदार चषक, नागपूर येथे सहभागी झालेल्या संगीत ग्रुपने अंतिम फेरीसाठी पात्रता मिळवल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

शाळेची गुणवंत विद्यार्थिनी कुमारी धृती विक्रम सिंग बैस हिची नवोदय विद्यालयासाठी निवड झाल्याबद्दल तिचाही गौरव करण्यात आला. रायफल शूटिंगमध्ये रौप्यपदक मिळिवल्याबद्दल इयत्ता दहावीची विद्यार्थिनी गुंजन अविनाश रीतपुरे हिचा सन्मान करण्यात आला. तालुकास्तरीय विज्ञान मेळाव्यात इयत्ता दहावीची विद्यार्थिनी कृतिका धनराज बमनोटे हिने द्वितीय क्रमांक मिळवल्याबद्दल तिचाही गौरव करण्यात आला.

शाळेसाठी अभिमानाची बाब ठरलेल्या धनश्री प्रवीण लांडगे हिची विदर्भ क्रिकेट असोसिएशनसाठी निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

गौरव सोहळ्यानंतर प्रमुख अतिथी विजय गुल्हाने यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व समजावून सांगत स्वातंत्र्य मिळिवण्यासाठी आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी केलेल्या त्यागाची जाणीव करून दिली. निवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी दिलीप बुरंगे यांनीही प्रेरणादायी विचार व्यक्त करत स्वातंत्र्याचे जतन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगितले.

शाळेच्या संचालक मंडळाचे माजी अध्यक्ष गोपाल वानखडे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा देत देशाप्रती असलेल्या कर्तव्याची जाणीव करून दिली.

यावेळी व्यासपीठावर विनय शहा, भागवत आंडे, महेश बोरकुटे, लीलाधर सुपले, किशोर काळमोरे, श्याम केंडे, तसेच शाळेचे अध्यक्ष डॉ.राम गोधने, माजी अध्यक्ष गोपाल वानखडे, उपाध्यक्ष सुधाकर ठाकरे, सचिव अनिल गुल्हाने, सहसचिव शाम खंडेलवाल, कोषाध्यक्ष डॉ.वेदांत राजोरिया, सदस्य विनय यावलकर, प्राचार्या माधुरी भोंडे, समन्वयक श्वेता गणोरकर, विभागप्रमुख किशोर देशमुख, पराग भोंडे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन शिक्षिका दीपाली राऊत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले आणि उत्साहपूर्ण वातावरणात स्वातंत्र्य दिन सोहळ्याची सांगता झाली.

## संपादकीय

**गरूडासारखी झेप घ्यायची असेल तर कावळ्यांची संगत सोडावी लागेल.**

### ८०वा स्वातंत्र्यदिन : स्वातंत्र्याचा अमृतवारसा आणि नवभारताची जबाबदारी

१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयाच्या मनात अभिमान, कृतज्ञता आणि देशभक्तीची भावना जागवणारा दिवस. १९४७ मध्ये भारताने ब्रिटिश राजवटीतून स्वातःत्र्य मिळिवले आणि एका नव्या युगाची सुरुवात झाली. २०२६ मध्ये आपण ८०वा स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहोत. आठ दशके म्हणजे केवळ काळाचा प्रवास नव्हे, तर संघर्ष, त्याग, विकास, परिवर्तन आणि राष्ट्रनिर्मितीचा प्रदीर्घ प्रवास आहे. या प्रवासाकडे मागे वळून पाहताना स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला नमन करण्याबरोबरच पुढील भारताची दिशा ठरविण्याची वेळ आली आहे. भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास अत्यंत संघर्षमय आहे. स्वातंत्र्यासाठी असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांनी आपले जीवन देशासाठी अर्पण केले. महात्मा गांधींचे अहिंसेचे तत्त्व, लोकमान्य टिळकांचा स्वराज्याचा आग्रह, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा संघर्ष, भगतसिंग, राजगुरू, सुखदेव यांचे बलिदान आणि असंख्य क्रांतिकारकांचे योगदान यामुळे स्वातंत्र्याची चळवळ जनतेच्या मनामनात पोहोचली. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि सामान्य नागरिक या सर्वांनी या लढ्यात सहभाग घेतला. त्यामुळे १५ ऑगस्ट हा केवळ उत्सवाचा दिवस नसून त्याग आणि संघर्षाची आठवण करून देणारा दिवस आहे. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर अनेक गंभीर आव्हाने होती. फाळणीचे दुःख, गरिबी, निरक्षरता, बेरोजगारी, आरोग्याच्या समस्या, अपुरी पायाभूत सुविधा आणि आर्थिक अडचणी अशा अनेक संकटांमधून देशाला मार्ग काढावा लागला. मात्र भारतीय लोकशाहीने या आव्हानांना सामोरे जात विकासाचा मार्ग स्वीकारला. संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य, न्याय आणि बंधुतेची हमी दिली. विविध भाषा, धर्म, संस्कृती आणि परंपरा असतानाही भारताने लोकशाहीची वाटचाल कायम ठेवली, ही जगासाठी महत्त्वाची बाब आहे. आजचा भारत तंत्रज्ञान, विज्ञान, शिक्षण, उद्योग, कृषी, अंतराळ संशोधन आणि डिजिटल क्षेत्रात वेगाने पुढे जात आहे. देशातील तरुणाई ही भारताची सर्वात मोठी ताकद आहे. स्टार्टअपपासून संशोधनापर्यंत, क्रीडापासून संरक्षण क्षेत्रापर्यंत भारतीय तरुण आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवत आहेत. अंतराळ संशोधनातील प्रगतीने भारताची क्षमता जगासमोर सिद्ध केली आहे. डिजिटल तंत्रज्ञानामुळे नागरिकांच्या दैनंदिन जीवनात मोठे बदल झाले आहेत. ग्रामीण भागातही तंत्रज्ञानाचा वापर वाढत आहे. मात्र विकासाच्या या प्रवासात काही प्रश्न अजूनही गंभीर आहेत. बेरोजगारी, आर्थिक विषमता, शेतकऱ्यांच्या समस्या, शिक्षणातील असमानता, पर्यावरणाचा ऱ्हास, प्रदूषण, भ्रष्टाचार आणि सामाजिक विभाजन यांसारख्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करून विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. केवळ मोठ्या इमारती, महामार्ग किंवा आधुनिक तंत्रज्ञान म्हणजे विकास नव्हे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचणे आवश्यक आहे.




# जलसंधारणातून घडवूया बारमाही हिरवा महाराष्ट्र

पाऊस पडतो तेव्हा आपण आनंदतो; पण तोच पाऊस वाहून जातो तेव्हा त्याच्याकडे दुर्लक्ष करतो. आकाशातून पडणारा प्रत्येक थेंब जमिनीवर थांबविणे, तो जमिनीत मुरविणे, भूजलपातळी वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करणे, हीच आजच्या महाराष्ट्राची सर्वात मोठी गरज आहे. म्हणूनच यंदा २१ ऑगस्ट रोजी साजरा होणारा जलसंधारण दिन हा केवळ शासकीय कार्यक्रम न राहता लोकसहभागाची नवी सुरुवात ठरली पाहिजे.

महाराष्ट्र शासनाने माजी मुख्यमंत्री स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २१ ऑगस्टला दरवर्षी 'जलसंधारण दिन' साजरा करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामागे जलसंधारण क्षेत्रातील सुधाकरराव नाईक यांच्या योगदानाचे स्मरण आणि जलसंधारणाची लोकचळवळ अधिक व्यापक करण्याचा उद्देश आहे. या दिवशी जलपूजन, विविध जलसंधारण कामांचे भूमिपूजन व लोकार्पण, श्रमदान, जनजागृती, उत्कृष्ट अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव आदी उपक्रम राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.याच पार्श्वभूमीवर राज्यात जलसंधारण दिनाच्या निमित्ताने आठवडाभर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

स्वातंत्र्यदिनाच्या ध्वजारोहण कार्यक्रमात शासकीय कार्यालयांमध्ये मृद व जलसंधारणाची शपथ घेऊन या लोकचळवळीची सुरुवात करण्यात आली. २१ ऑगस्ट रोजी 'महा वॉकेथॉन-वॉक फॉर वॉटर', रील्स स्पर्धा, जलपूजन, श्रमदान आणि जनजागृतीचे उपक्रम नागरिकांना सहभागी करून घेण्यासाठी आयोजित केले जात आहेत.




**जलसंधारण म्हणजे काय**

पावसाचे पाणी शक्य तितक्या मोठ्या प्रमाणात जमिनीवर अडविणे, त्याचा वेग कमी करणे, जमिनीत मुरविणे, भूजलाचे पुनर्भरण करणे, जलस्रोतांची साठवण क्षमता वाढविणे आणि उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर करणे, याला व्यापक अर्थाने जलसंधारण म्हणता येईल. जलसंधारण म्हणजे केवळ बंधारा बांधणे नव्हे. पाण्याचा प्रत्येक थेंब जिथे पडतो, तिथेच त्याचा अधिकाधिक उपयोग करणे, ही त्यामागची मूलभूत संकल्पना आहे.

महाराष्ट्रासाठी ही बाब अधिक महत्त्वाची आहे. राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी सुमारे ५२ टक्के क्षेत्र अवर्षणप्रवण आहे. पावसाचे भौगोलिक आणि कालिक वितरण असमान आहे. काही भागात अतिवृष्टी होते, तर काही भागात पावसाची प्रतीक्षा करावी लागते. त्यामुळे 'पाणी आहे, पण योग्य वेळी आणि योग्य ठिकाणी नाही' हीच मोठी समस्या आहे. जलसंधारणातून या विसंगतीवर मात करता येते.

**महाराष्ट्राच्या जलसंधारणाची मुळे**

महाराष्ट्रात जलसंधारणाची परंपरा नवी नाही. गावागावातील तलाव, बंधारे, पाझर तलाव, विहिरी आणि पारंपरिक जलव्यवस्थापन ही ग्रामीण जीवनाची पूर्वापार साधने आहेत. ही परंपरा थेट छत्रपती शिवरायांचा काळापर्यंत जाते. गड किल्ल्यावर पावसाचे पाणी साठवण्याची मोठी परंपरा आहे. यावर महाराष्ट्राने शिवकालीन पाणी साठवण योजनाही सुरु केली आहे. आधुनिक शासकीय पातळीवर मात्र जलसंधारणाला स्वतंत्र संस्थात्मक दिशा मिळाली ती स्वतंत्र जलसंधारण विभागाच्या स्थापनेमुळे.महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनीही १९७२ च्या दुष्काळानंतर जलसंधारण माध्यमातून 'जलक्रांन्ती' घडवून आणली होती. त्यांनी पाणी अडवा पाणी जिरवा ही संकल्पना राबवून पाणलोट क्षेत्र वाढवले मोठ्या धरणांपेक्षा बॅरेजेसला महत्व दिले.

**जलयुक्त शिवारातून नव्या पर्वाला सुरुवात**

जलसंधारणाला मोठ्या प्रमाणावर लोकचळवळीचे स्वरूप देण्याच्या दृष्टीने २०१४ नंतरचा काळ महत्त्वाचा ठरतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पहिल्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात ५ डिसेंबर २०१४ च्या शासन निर्णयानुसार जलयुक्त शिवार अभियान सुरू करण्यात आले. या योजनेतून पुढे हजारो हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली. लक्षावधी टीएमसी पाणी साठा निर्माण झाला. हजारो गावे पाणीदार झाली. त्यांचा शाश्वत विकास झाला.

आज जलयुक्त शिवार २.०च्या माध्यमातूनही जलसंधारण, जलसाक्षरता, लोकसहभाग आणि उपलब्ध भूजलाच्या शाश्वत वापरावर भर दिला जात आहे. मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनीही स्पष्टपणे सांगितले आहे की, महाराष्ट्राच्या दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणातून परिवर्तन घडविणे आवश्यक आहे.

**योजनांची ताकद, लोकसहभागाची साथ**

महाराष्ट्राने जलसंधारणासाठी अनेक मार्ग स्वीकारले आहेत. 'मागेल त्याला शेततळे' योजनेला २०१६ मध्ये सुरुवात करून शेतकऱ्यांना स्वतःची संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्याची संधी देण्यात आली.

'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' ही संकल्पना तर जलसंधारण आणि शेती यांची सांगड घालणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे जलाशयाची साठवण क्षमता वाढते आणि तोच गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची सुपीकता वाढण्यास मदत होते. २०२४ मध्ये ही योजना कायमस्वरूपी राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याशिवाय विहीर पुनर्भरण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, नाला खोलीकरण व रुंदीकरण, सिमेंट बंधारे, गॅबियन बंधारे, वनराई बंधारे, सलग समतल चर, शेततळी, जलस्रोतांमधील गाळ काढणे, बांधावर वृक्ष व बांबू लागवड अशा असंख्य उपाययोजना राज्यात राबविल्या जात आहेत.

**देशातील प्रेरणादायी उपक्रम**

राजस्थानच्या अलवरमध्ये पारंपरिक 'जोहड' या पावसाच्या पाण्याच्या साठवण संरचनांचे पुनरुज्जीवन करून गावकऱ्यांनी जलव्यवस्थापनाचे प्रभावी मॉडेल उभे केले. जलतज्ज्ञ आणि 'वॉटर मॅन ऑफ इंडिया' म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखालील लोकसहभागातून कोरड्या प्रदेशात जलस्रोत पुनरुज्जीवित झाले आणि अरवरीसारख्या नद्यांना पुन्हा प्रवाह मिळाला.

महाराष्ट्रात राळेगणसिद्धी आणि हिवरे बाजार ही दोन उदाहरणे तितकीच प्रेरणादायी आहेत. राळेगणसिद्धीत नाला बांध, गली प्लगिंग, समतल चर, पाझर तलाव आणि लोकसहभागातून दुष्काळी गावाचा कायापालट झाला. हिवरे बाजारने पाण्याचे बजेट, पिकांचे नियोजन, ठिबक सिंचन, भूजल पुनर्भरण आणि जलसंधारण यांची सांगड घालत जलसुरक्षेचे आदर्श मॉडेल निर्माण केले.

**नागरिकांनी काय करायचे**

शासन आपले काम करीत आहे; परंतु जलसंधारणाची खरी यशोगाथा नागरिकांच्या सहभागाशिवाय पूर्ण होणार नाही. या पावसाळ्यात प्रत्येक नागरिकाने आपल्या घराच्या छतावरील पाणी साठविण्याची किंवा जमिनीत मुरविण्याची व्यवस्था करावी. गावांनी पाण्याचा ताळेबंद तयार करावा. शेतकऱ्यांनी शेततळी, बांधबंदिस्ती, विहीर पुनर्भरण, ठिबक-सिंचन आणि पिकांच्या पाण्याच्या गरजेनुसार नियोजन करावे. गावातील नाले, तलाव, बंधारे आणि पारंपरिक जलस्रोत यांची स्वच्छता व देखभाल करावी. शक्य तेथे श्रमदान करावे. पाणी वाया जाणार नाही, याची प्रत्येक कुटुंबाने काळजी घ्यावी.आणि पावसाळा सुरु आहे. वृक्ष लागवडीत कुटूंबाने दरवर्षी एक या प्रमाणे वृक्ष लागवड करावी. जलसंधारण हा केवळ मृद व जलसंधारण विभागाचा विषय नाही; तो कृषीचा, ग्रामविकासाचा, पर्यावरणाचा, अर्थव्यवस्थेचा आणि भविष्यातील पिढ्यांचा विषय आहे. कारण पाणी वाचले तर शेती वाचेल, शेती वाचली तर गावाची अर्थव्यवस्था वाचेल आणि गाव समृद्ध झाले तर महाराष्ट्र समृद्ध होईल.

म्हणून २१ ऑगस्टचा जलसंधारण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा दिवस न राहता प्रत्येकाच्या मनात एक संकल्प निर्माण करणारा दिवस ठरू दे. चला !जलसंधारणातून 'बारमाही हिरवा महाराष्ट्र!' घडवूया!

**प्रवीण टाके**
**उपसंचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय**
**छत्रपती संभाजीनगर**
**मो.क्र.९७०२८५८७७७**

# मक्का करार : बदलत्या जागतिक सत्ता समीकरणांची नांदी?

सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्की यांच्यातील संयुक्त संरक्षण करारामुळे पश्चिम आशियातील सामरिक समीकरणांना नवी दिशा; भारतासह जगाचे लक्ष या नव्या घडामोडीकडे

७ ऑगस्ट २०२६ रोजी मक्का येथे सौदी अरेबिया, पाकिस्तान आणि तुर्की यांनी 'मक्का संयुक्त संरक्षण करार'वर स्वाक्षऱ्या केल्या. या करारानुसार तीनपैकी कोणत्याही एका देशावर सशस्त्र हल्ला झाल्यास तो तिन्ही देशांवरील हल्ला मानला जाईल. सामूहिक प्रतिबंधक क्षमता मजबूत करणे आणि संरक्षण क्षेत्रातील सहकार्य वाढविणे हा या कराराचा प्रमुख उद्देश असल्याचे तिन्ही देशांनी स्पष्ट केले आहे.



या कराराकडे केवळ लष्करी सहकार्य म्हणून पाहणे अपुरे ठरेल. सौदी अरेबियाचे आर्थिक आणि ऊर्जाक्षेत्रातील महत्त्व, पाकिस्तानची लष्करी क्षमता आणि तुर्कीचे व्यापक संरक्षण कौशल्य या तिन्ही घटकांचा एकत्रित विचार केला तर या कराराला व्यापक सामरिक महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे पश्चिम आशियापासून दक्षिण आशियापर्यंतच्या राजकारणावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता आहे. मक्का करारामागे बदलते प्रादेशिक सुरक्षा वातावरण हा महत्त्वाचा घटक आहे. पश्चिम आशियातील तणाव, संघर्ष आणि सुरक्षेच्या प्रश्नांमुळे आखाती देशांना स्वतःची संरक्षणक्षमता अधिक सक्षम करण्याची गरज जाणवत आहे. अशा परिस्थितीत सामूहिक संरक्षणाचा करार हा संभाव्य धोक्यांपासून प्रतिबंध निर्माण करण्याचा प्रयत्न म्हणून पाहता येतो.

या कराराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिन्ही देशांची वेगवेगळी सामरिक ओळख. पाकिस्तान हा अण्वस्त्रधारी मुस्लिमबहुल देश आहे, सौदी अरेबिया हा जगातील महत्त्वाचा तेल उत्पादक आणि इस्लाममधील पवित्र स्थळांचा संरक्षक देश आहे, तर तुर्की हा नाटोचा सदस्य असून त्याची संरक्षण उद्योगातील क्षमता लक्षणीय आहे. या तीन देशांचे सामर्थ्य एकत्र आल्याने भविष्यात संरक्षण तंत्रज्ञान, प्रशिक्षण, औद्योगिक सहकार्य आणि सामरिक समन्वयाला चालना मिळू शकते. तथापि, या कराराला लगेच एखाद्या नव्या लष्करी गटाचे स्वरूप देणे योग्य ठरणार नाही. सौदी अधिकाऱ्यांनी हा करार कोणत्याही देशाविरुद्ध लष्करी आघाडी किंवा पंथीय गट निर्माण करण्यासाठी नसल्याचे स्पष्ट केले आहे. तुर्कीचे राष्ट्राध्यक्ष रेसेप तय्यिप एर्दोगान यांनीही हा करार कोणत्याही विशिष्ट देशाला लक्ष्य करत नसल्याचे सांगितले आहे. भारतासाठी या घडामोडीचे महत्त्व विशेष आहे. भारताचे सौदी अरेबिया आणि तुर्कीशी वेगवेगळ्या स्वरूपाचे संबंध आहेत. सौदी अरेबियासोबत भारताचे ऊर्जा, व्यापार आणि गुंतवणुकीचे संबंध महत्त्वाचे आहेत. दुसरीकडे पाकिस्तानसोबत भारताचे संबंध संवेदनशील आहेत. त्यामुळे या करारामुळे दक्षिण आशियातील सामरिक समीकरणांमध्ये कोणते बदल होतात, याकडे भारताला बारकाईने लक्ष ठेवावे लागेल.

मात्र भारताने या घडामोडीकडे घाईघाईने प्रतिक्रिया देण्यापेक्षा आपल्या राष्ट्रीय हितांच्या दृष्टीने शांतपणे आणि दूरदृष्टीने पाहणे अधिक योग्य ठरेल. भारताची आर्थिक ताकद, संरक्षणक्षमता, राजनैतिक संबंध आणि विविध देशांशी असलेली भागीदारी ही त्याची महत्त्वाची सामरिक साधने आहेत. पश्चिम आशिया आणि आखाती देशांशी भारताचे संबंध केवळ सुरक्षेपुरते मर्यादित नसून ऊर्जा, व्यापार, रोजगार आणि भारतीय समुदायाशीही जोडलेले आहेत.

मक्का कराराचा आणखी एक संभाव्य परिणाम म्हणजे मुस्लिम जगतातील प्रादेशिक सहकार्याला चालना मिळणे. इस्लामिक सहकार्य संघटनेने या कराराचे स्वागत करत तो प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा असल्याचे म्हटले आहे.

पण कोणत्याही संरक्षण कराराचे खरे सामर्थ्य त्याच्या घोषणेत नसते, तर प्रत्यक्ष अंमलबजावणीत असते. तिन्ही देशांमध्ये संरक्षण सहकार्य किती वाढते, संयुक्त प्रकल्प किती विकसित होतात आणि भविष्यातील संभाव्य संकटांमध्ये हा करार कशा पद्धतीने कार्य करतो, यावर त्याचे वास्तविक महत्त्व अवलंबून राहील.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

नवोदय उच्च माध्यमिक विद्यालय व नागोरावदादा सदाफळे नवोदय विद्यालयात

# भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा वर्धापन दिन उत्साहात

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**हिवरखेड** – ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ हिवरखेड द्वारा संचालित नवोदय उच्च माध्यमिक विद्यालय व नागोरावदादा सदाफळे नवोदय विद्यालय येथे भारतीय स्वातंत्र्याचा ७९ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न झाला.



ध्वजारोहण मनोहर आमले यांचे हस्ते पार पडले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष अनिल बंड होते तर व्यासपीठावर संस्थाध्यक्ष श्रीपाद पाटील, मनोहर ढोमणे, दिलीप कवठकर, शरद तिडके, नरेंद्र पाटील, संजय बोंडे, चंद्रशेखर राऊत, मुख्याध्यापक श्रीकांत विघे, अंबादास वानखडे, सुनीता श्रीवास, सविता ठाकरे, प्रल्हाद बुले इत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभली होती.

यावेळी इयत्ता दहावीमध्ये प्रथम आलेली संस्कृती राऊत, ईयत्ता बारावीमध्ये प्रथम आलेली राधिका चव्हाण या विद्यार्थिनींना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. याप्रसगी अनिल बंड, मनोहर आमले, श्रीपाद ढोमणे यांनी विचार व्यक्त केले.

संचालन महादेव नागदेवे तर आभार उमेश चव्हाण यांनी केले. प्रा.अमोल देशमुख, प्रा.हेमंत देशमुख, दिनेश निंभेकर, प्रा.साक्षी दुर्गे, स्वाती पारिसे, कविता वरठी, पूजा सदाफळे, वृषाली दारोकर, निलेश रायचुरा, दिलीप अजमिरे, राजेंद्र धोटे, अशोक डवरे इत्यादी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेकरिता सहकार्य केले.

एकता ग्रामीण व शहरी विकास बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने

# स्वातंत्र्य दिनानिमित्त विविध स्पर्धांचे आयोजन

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**पुसला** – एकता ग्रामीण व शहरी विकास बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने ८० व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त चित्रकला स्पर्धा, भाषणे, सांस्कृतिक कार्यक्रम, देशभक्तीपर कराओके साँग स्पर्धा आयोजित करण्यात आलेली होती. या स्पर्धेमध्ये गुणवंत कोचिंग क्लासेसच्या बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग घेतलेला होता. स्पर्धेमध्ये विजयी होणाऱ्या स्पर्धांना रायगड शाळेचे मुख्याध्यापक सागर बागडे यांच्या वतीने रोख स्वरुपाचे बक्षीस व मेडल्स देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भारती गुल्हाने यांनी भुषविले होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन सौ.पाटणकर होत्या तसेच संस्थाध्यक्ष सिद्धार्थ डोंगरे, निखिल श्रीराव, मंगेश विरखडे, रोशन वानखडे कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक गुणवंत कोचिंग क्लासेसचे संचालक सिद्धार्थ डोंगरे, संचालन रुचिका खासबागे तर आभार वर्निका तरार यांनी मानले.



रक्तदानातून माणुसकीचा नवा उच्चांक : १,२९८ रक्तदात्यांचा सहभाग

# अमरावतीत १,१८७ तर धारणीत १११ रक्तपिशव्यांचे संकलन : थॅलेसेमिया, अपघातग्रस्त व आपत्कालीन रुग्णांसाठी उपक्रम

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**अमरावती** – सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून राज्य उत्पादन शुल्क विभाग आणि जिल्हा देशी-विदेशी मद्य विक्रेता संघाच्या महारक्तदान शिबिरात १ हजार २९८ रक्तदात्यांनी रक्तदान करून एक नवीन उच्चांक प्रस्थापित केला आहे. हॉटेल ग्रँड महफील येथील रुबी हॉल येथे शिबीर पार पडले.





या शिबिरादरम्यान शहरात १ हजार १८७ रक्त पिशव्या, तर धारणी तालुक्यात १११ रक्त पिशव्यांचे संकलन करण्यात आले. शिबिराचे उद्घाटन शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी खासदार अनिल बोंडे, बळवंत वानखडे, आमदार प्रविण पोटे पाटील, संजय खोडके, सुलभा खोडके, रवी राणा, राजेश वानखडे, महापौर श्रीचंद तेजवानी, उपमहापौर सचिन भेंडे, महापालिकेच्या शिक्षण सभापती प्रिती रेवणे, सुनील देशमुख जिल्हाधिकारी आशिष येरेकर, जिल्हा पोलीस अधीक्षक निकेतन कदम, मुख्य वनसंरक्षक आदर्श रेड्डी उपस्थित होते.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे विभागीय उपआयुक्त डॉ.पराग नवलकर यांनी आतापर्यंत यवतमाळ, अहिल्यानगर, बुलढाणा, वाशीम आणि अमरावती येथे १७ महारक्तदान शिबिरांचे आयोजन करून ९ हजार २६१ रक्त पिशव्यांचे संकलन केले आहे. १५ ऑगस्टच्या या शिबिरासह त्यांनी एकूण १८ शिबिरांच्या माध्यमातून एकूण १० हजार ५५९ रक्त पिशव्यांचे संकलन करत १० हजारांचा टप्पा पार केला आहे. या उपक्रमाची दखल स्टेट ब्लड ट्रान्सफ्यूजन महाराष्ट्र, मुंबई यांनी घेतली आहे. रक्तदान शिबीरात ९ प्रमुख रक्तपेढ्यांनी सहभाग नोंदवला. यात अमरावती येथील इर्विन हॉस्पिटल, शासकीय रक्तपेढी, गोडे पाटील मेडिकल कॉलेज, संत गाडगेबाबा रक्तपेढी, डॉ.पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज, अकोला येथील लेडी हार्डिंग हॉस्पिटल, जिल्हा स्त्री रुग्णालय, डॉ.हेडगेवार रक्तपेढी, नागपूर येथील डॉ.हेडगेवार रक्तपेढी, जालना येथील जनकल्याण रक्तपेढी, यवतमाळ येथील एकनील रक्तपेढी यांनी सहभाग नोंदविला. शिबीराला महापालिकेचे विरोधी पक्षनेता विलास इंगोले, नगरसेवक दीपक सम्राट, प्रदिप हिवसे, चंदूर खेडकर, संजय तिरथकर, यश खोडके, सुनील राणा यांनी भेट दिली. शिबीरात मेजन आनंद, मुख्य वनसंरक्षक आदर्श रेड्डी, अधीक्षक प्रमोद सोनोने, शशिकांत गर्जे, सीमा झावरे, नितीन देशमुख, अनिल भामोरे यांनी रक्तदान केले. यावेळी आनंद भामोरे, राजूभैय्या जैस्वाल, हरीश आलमचंदानी, इस्माइल लालूवाले, सायकलिंग असोशिएशनचे डॉ.कुळकर्णी यांचा सत्कार करण्यात आला. शिबीरासाठी सहकार्य करणारे डॉक्टर, आरोग्य कर्मचारी यांचा सत्कार करण्यात आला. प्रतिक्षा डांगे यांनी सूत्रसंचालन केले. राजगुरे यांनी आभार मानले.

थॅलेसेमियाचे रुग्ण, आपत्कालीन शस्त्रक्रिया आणि अपघातातील रुग्णांसाठी रक्ताचा तुटवडा भासू नये या उद्देशाने शिबीराचे आयोजन करण्यात आले. संघातर्फे अध्यक्ष नितीन देशमुख, उपाध्यक्ष अनिल भामोरे, राज्य उत्पादन शुल्काचे अधीक्षक शशांक गर्जे यांनी शिबीर यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# बावनकुळे म्हणजे संघर्षाचा कोहिनूर : टीकेने त्यांची चमक कमी होणार नाही!

**कुणाल ढबाले यांचा मनोज जरांगे पाटील यांच्यावर पलटवार**

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**नरखेड** – महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविरोधात मनोज जरांगे-पाटील यांनी केलेल्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यावरून राजकीय वातावरण तापले आहे. बावनकुळे यांच्या समर्थनार्थ भाजपा युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष व सरपंच कुणाल ढवाले यांनी जरांगे यांच्या वक्तव्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आहे.



बावनकुळे म्हणजे संघर्षाचे जिवंत उदाहरण आहे. त्यांच्यावर टीकेचे कितीही दगड फेकले तरी त्यांच्या कर्तृत्वाची चमक कमी होणार नाही. शब्दांनी व्यक्तिमत्त्व मोठे होत नाही तर जनसेवा, संघर्ष आणि कर्तृत्वाने नेता मोठा होतो, असे ढबाले म्हणाले. बावनकुळे यांचा राजकीय प्रवास तळागाळातील संघर्षातून घडला आहे.

सामान्य कार्यकर्ता म्हणून सुरुवात करून त्यांनी संघटन मजबूत केले. जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने काम केले. राजकीय मतभेद असल्यास घोरणे आणि कामावर टीका करावी, मात्र वैयक्तिक व कुटुंबीयांवर आक्षेपार्ह वक्तव्य करणे योग्य नाही. मराठा समाजाला शौर्याबरोबर संस्कार, स्वाभिमान आणि संयमाची परंपरा आहे. जरगि यांनी कथित आक्षेपार्ह वक्तव्य मागे घ्यावे, अशी मागणी ढबाले यांनी केली आहे.

# दिल्लीतील आंदोलनात 'तो' नक्षलवादी काय करत होता?

**अभिजीत दिपके जबाबदारी घेणार का? जनसंघर्ष समितीची प्रश्नांची सरबत्ती**

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**मुंबई** – कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने दिल्लीत आयोजित करण्यात आलेल्या नीट परीक्षेच्या पेपरफुटीविरोधातील आंदोलनावरून मोठा वाद निर्माण झाला आहे.

या आंदोलनात कोर्टात दोष सिद्ध झालेला आणि शिक्षा भोगून आलेला नक्षलवादी अरुण भेलके सहभागी झाल्याचे उघडकीस आले आहे. नक्षल पीडितांसाठी काम करणाऱ्या जन संघर्ष समितीने या गंभीर मुद्द्यावरून आयोजक अभिजीत दीपके यांच्यावर प्रश्नांची सरबत्ती करत या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणी केली आहे.



दिल्लीतील सीजेपीच्या आंदोलनातील अरुण भेलकेचा एक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये अरुण भेलके लोकशाहीच्या सर्वोच्च मंदिराविषयी म्हणजेच संसदेविषयी आक्षेपार्ह आणि धमकीवजा विधान करताना दिसत आहे. 'आता तरी मोजकेच तरुण दिल्लीतील रस्त्यावर आले आहेत... एके दिवशी लाखो करोडो लोक रस्त्यावर उतरून दिल्लीतील संसद उखडून फेकून देतील,' असा इशारा देताना तो दिसून येत आहे. या विधानामुळे राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

अरुण भेलके मूळचा चंद्रपूरचा असून सुरुवातीच्या काळात विद्यार्थी आंदोलनाच्या माध्यमातून काम करायचा.

नक्षल चळवळीसोबत संबंध आले आणि त्याने चंद्रपूर आणि गडचिरोलीतील जंगलात नक्षलींसोबत काम केले. त्याने कुख्यात नक्षली कमांडर मिलिंद तेलतुंबडे सोबत काम केल्याचे ही तपास यंत्रणांचे म्हणणे आहे. नंतर नक्षली थिंक टँककडून त्याला मुंबई – पुणे परिसरात काम करण्यासाठी पाठविले गेले.

२०१४ मध्ये एटीएसने त्याला पुण्यातील कासेवाडीमधून अटक केली. त्याच्याकडून एटीएसने नक्षलवाद्यांशी संबंधित हस्तलिखित कागदपत्रे, तसेच नक्षलवादाशी संबंधित मजकूर असलेल्या लॅपटॉप, पेन ड्राईव्ह व इतर इलेक्ट्रॉनिक डिवाइस जप्त केले होते.एटीएसने अरुण भेलके विरोधात 'बेकायदा प्रतिबंधक हालचाल कायदा' म्हणजेच णअझअ अंतर्गत गुन्हा नोंदविला.

त्याच गुन्ह्यात एटीएसच्या विशेष न्यायालयाने अरुण भेलकेला ८ वर्षे सक्त मजुरीची शिक्षा सुनावली होती. २०२३ मध्ये अरुण भेलके शिक्षा भोगून तुरुंगा बाहेर पडला. आता तो सीजेपीच्या दिल्लीतील आंदोलनात लोकशाहीचे सर्वोच्च सदन असलेल्या संसदेबद्दल आक्षेपार्ह विधान करताना दिसून आला.

# हिवरखेड ग्राम वाचनालय येथे स्वातंत्र्य दिन निमित्ताने ध्वजारोहण

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**हिवरखेड** – हिवरखेड ग्राम वाचनालय येथे स्वातंत्र्य दिन निमित्ताने ध्वजारोहण करण्यात आले.




कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी हरिमोहन ढोमणे होते तर गोपाल मालपे यांचे ध्वजारोहण पार पडले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन मोहन सातपुते, जमीलभाई कुरेशी उपस्थित होते.

यावेळी पाहुण्यांचे पुष्प देऊन स्वागत तर पाहुण्यांचे हस्ते थोर पुरुषांचे प्रतिमेचे पूजन करुन हारार्पण करण्यात आले. हिवरखेड ग्राम वाचनालयाचे अध्यक्ष नानासाहेब धरमकर, सचिव साहेबराव निंभेकर, कोषाध्यक्ष साहेबराव पाटील तसेच वाचनालायचे सर्व पदाधिकारी, गावातील प्रतिष्ठित नागरिक, महात्मा फुले हायस्कूल व गंगाबाई चौधरी कन्या हायस्कूलच्या प्रभात फेरीने या कार्यक्रमाची शोभा वाढविली. कार्यक्रमाचे संचालन सदस्य देवेंद्र गोरडे, प्रास्तविक ग्रंथापाल अनंतराव फांजे यांनी केले. कार्यक्रमाचे नियोजन लिपिक पंकज भडके व पुष्पलता गुळकरी यांनी केले होते.

माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालयात

# एन.एस.वडनेरकर यांचे हस्ते उत्साहात ध्वजारोहण

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**लोणी** – येथील माध्यमिक विद्यालय कला वाणिज्य व्यावसायिक अभ्यासक्रम कनिष्ठ महाविद्यालय लोणी येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त एन.एस.वडनेरकर यांचे हस्ते मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात ध्वजारोहण करण्यात आले.



यावेळी ध्वजारोहण समारोहाचे मुख्य अतिथी अप्पर वर्धा प्रकल्पग्रस्त वेलफेअर सोसायटीचे उपाध्यक्ष मनोहर पावडे होते तर विशेष अतिथी म्हणुन माजी प्राचार्य आर.एच.जवंजाळ, एम.एम.रानोटकर, ए.यु.पुनसे, सेवानिवृत्त शिक्षक एन.डी.खेडकर, दुर्गा धोटे, आर.जी.लोखंडे, अरुण पावडे, संजय बांबल, प्राचार्या एस.एम.दुर्योधन, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत महामानवांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी एन.एस.वडनेरकर यांचे हस्ते उत्साहात ध्वजारोहण करुन विद्यार्थ्यांनी सलामी दिली. विद्यार्थ्यांनी तिरंगा या गीतावर नृत्य सादर करुन उपस्थितांचे मने जिंकली सोबतच 'एक पेड़ मां के नाम' या अभियान अंतर्गत विद्यालयाच्या प्रांगणात मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

यामध्ये चित्ररंगण, पोस्टर प्रदर्शनी, रांगोळी,निबंध, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे संचालन प्रशांत ब्राम्हणे यांनी केले.

# कुंभनगरीचा नावलौकिक देश-विदेशात उंचावण्यासाठी प्रयत्नशील : पालकमंत्री गिरीश महाजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – कुंभनगरी नाशिक जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी माझ्यावर सोपविण्यात आली आहे. ही जबाबदारी सोपवल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार व्यक्त करतो. नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच आगामी कुंभमेळ्याच्या जिल्ह्याच्या विकासाला आणि गती देण्यासाठी तसेच कुंभनगरीचा नावलौकिक देश-विदेशात अधिक उंचावण्यासाठी सदैव प्रयत्नशील असल्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांच्या नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या विकासाभिमुख धोरणांच्या माध्यमातून नाशिक जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. शासन, प्रशासन आणि जनतेच्या समन्वयातून नाशिकच्या विकासाची गती वाढविण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्यात येणार आहे. नाशिकची ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि औद्योगिक ओळख अधिक मजबूत करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

# एमएआयएम नगरसेवक मतीन पटेलला जामीन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





***नाशिक*** – नाशिकच्या बहुचर्चित टीसीएस कंपनीतील अविवाहित तरुणीवरील अत्याचार आणि धर्मांतराचा प्रयत्न प्रकरणात मोठी माहिती समोर येत आहे.

निदा खानला आश्रय देणारा छत्रपती संभाजीनगर येथील एमआयएम नगरसेवक मतीन पटेल याला नाशिक रोड न्यायालयाने ७५ हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर सशर्त जामीन मंजूर केला आहे. त्यामुळे मतीन पटेल याला काहीसा दिलासा मिळाला आहे. सोमवारी पार पडलेल्या सुनावणीदरम्यान संशयित तौसिफ अत्तार आणि निदा एजाज खान हे दोघे न्यायालयात प्रत्यक्ष हजर होते. तर मुख्य संशयित दानिश शेख आणि मतीन पटेल यांना मध्यवर्ती कारागृहातून व्हीडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे न्यायालयासमोर सादर करण्यात आले. यावेळी दानिश शेखच्या जामीन अर्जाला मूळ पीडित तरुणीच्या वकिलांनी विरोध करत न्यायालयात जबाब नोंदवला.

## जि.प.प्राथमिक शाळा पांढरघाटी येथे

# स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – जि.प.प्राथमिक शाळा पांढरघाटी येथे भारताच्या ८० व्या स्वातंत्र्य दिनाचा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.

शाळा व्य.समिती अध्यक्ष जगदीश परतेती, पोलीस पाटील विजय इडपाची, ग्रा.पं.सदस्य फुलाबाई सलामे, अनिल युवनाते, सुखदेव कोडापे आदींच्या हस्ते दीपप्रज्वलन व महामानवांच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले. मुख्याध्यापक सुधीर कांबळे यांचे हस्ते राष्ट्रध्वज फडकविण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, नृत्य आणि चारोळ्यांच्या माध्यमातुन आपली कला सादर केली. लहानग्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. यावेळी खडका, पांढरघाटीचे सरपंच राहुल फुले यांचे अध्यक्षतेखाली बक्षीस वितरण समारंभ घेण्यात आला. यावेळी त्यांच्याकडून सर्व शालेय विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले.

याप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन ग्राम तंटामुक्त समिती अध्यक्ष सुधाकर कुबडे, ग्रा.पं.सदस्य बालु गावंडे, अतुल कोहळे, गणेश लहाने, पोलीस पाटील विजय गेडाम उपस्थित होते.

शाळेच्या प्रांगणात विद्यार्थी, शिक्षक तसेच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. सरपंच राहुल यांनी शाळेच्या विकासासाठी लागणाऱ्या सहकार्याला आम्ही सदैव तत्पर आहो नव्हे ती आमची जबाबदारी आहे, असे सांगितले.

खडका येथील सॉफ्टवेअर इंजिनियर रितेश कुबडे व भाग्यश्री कुबडे या दाम्पत्याने आपल्या मुलीचा चौथा वाढदिवस जि.प.शाळा पांढरघाटी येथे साजरा करुन त्यानिमित्य सर्व विद्यार्थ्यांना लेखन साहित्य वाटप केले व खाऊचे सुद्धा वाटप केले. विशेष म्हणजे हे दांपत्य चार वर्षापासुन आपल्या मुलीचा वाढदिवस पांढरघाटी येथील विद्यार्थ्यांसोबत साजरा करतात. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन सारिका ठाकरे तर आभार मुख्याध्यापक सुधीर कांबळे यांनी मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उषा धुर्वे, बेबी कंगाले, माला आहाके, शांती कंगाले, सीता ईडपाची, वसंता आहाके, हरसिंग उईके, अनिल आहाके, मुकेश उईके, आकाश आहाके, देविदास परतेती, शाळेचे शिक्षक, कर्मचारी तसेच ग्रामस्थांचे विशेष सहकार्य लाभले.

# मल्लिकार्जुन खरगेंच्या गोवा दौऱ्यापूर्वी काँग्रेसला मोठा धक्का

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## अनेक बूथ लेव्हल एजंट्सचे राजीनामे



***नवी दिल्ली*** – काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांच्या महत्त्वपूर्ण गोवा दौऱ्यापूर्वीच गोवा काँग्रेसमध्ये मोठा राजकीय भूकंप झाला आहे. पक्षाच्या तब्बल १०८ बूथ लेव्हल एजंट्सनी आपल्या पदांचे राजीनामे दिले आहेत. काही पदाधिकाऱ्यांनी आपल्या राजीनामा पत्रांच्या प्रती जाहीर केल्याने पक्षातील अंतर्गत नाराजी आणि अस्वस्थता उघड झाली आहे. खरगे यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर एवढ्या मोठ्या प्रमाणावर राजीनामे सत्र सुरू झाल्याने काँग्रेसच्या संघटनात्मक रचनेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

मल्लिकार्जुन खरगे हे आपल्या गोवा दौऱ्यादरम्यान बूथ पातळीवरील कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधणार होते. मात्र, त्याआधीच तळागाळातील कार्यकर्त्यांनी सामूहिक राजीनाम्यांचे शस्त्र उपसल्याने राष्ट्रीय नेतृत्वाची डोकेदुखी वाढली आहे. बूथ पातळीवरील कार्यकर्ते हेच कोणत्याही पक्षाच्या संघटनेचा मुख्य आधार असतात, त्यामुळे या घटनेकडे गांभीर्याने पाहिले जात आहे.

निर्णयप्रक्रियेवर कार्यकर्त्यांची तीव्र नाराजी काँग्रेस पक्षाकडून सातत्याने तळागाळातील संघटना मजबूत करण्याचे दावे केले जातात; परंतु प्रत्यक्ष अंमलबजावणीत कार्यकर्त्यांचा आवाज वरिष्ठांपर्यंत पोहोचत नसल्याचा आरोप होत आहे. पक्षातील महत्त्वाच्या बैठका, निवडणूक नियोजन आणि संघटनात्मक निर्णयांमध्ये सामान्य कार्यकर्त्यांना डावलून केवळ मोजक्या नेत्यांच्या प्रभावाखाली निर्णय घेतले जात असल्याचा आरोप नाराज पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

# वर्चस्ववादातून गोळीबार ! ३२ वर्षीय युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***नाशिक*** – जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला खरंच राहिला आहे का असा प्रश्न नाशिकमध्ये घडणाऱ्या गुन्हेगारीच्या घटनांमुळे उपस्थित होत आहे. गुन्हेगारांमध्ये, हुल्लडबाजांमध्ये कायद्याची भीती निर्माण व्हावी, यासाठी नाशिक पोलिसांकडून 'नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला' असे वदवून घेण्यात येत होते मात्र गुन्हेगारांचे पोलिसांना आव्हान देण्याची खुमखुमी कायम असल्याचे पुन्हा समोर आले आहे. नाशिकरोड परिसरात वर्चस्ववादाच्या लढाईत सराईत गुन्हेगारांकडून एका ३२ वर्षीय युवकावर गोळीबार करण्यात आला होता. उपचारादरम्यान या युवकाचा मृत्यू झाला आहे. या प्रकरणात दहा हून अधिक संशयितांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# जेन-झी साठी मराठी चित्रपट निर्मितीत राज्य सरकार सहभागी होणार : आशिष शेलार यांची घोषणा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – मराठी चित्रपटसृष्टीतील नव्या पिढीला, विशेषतः जेनझी प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या विशेष चित्रपटाच्या निर्मितीत महाराष्ट्र शासन सहभागी होणार, अशी महत्त्वाची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री अॅड.आशिष शेलार यांनी केली.

आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, व्हिज्युअल इफेक्ट्स आणि अत्याधुनिक निर्मिती तंत्राचा वापर करून मराठी चित्रपटांना नव्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. प्रभादेवी येथील पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळ आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिसंवादात अॅड.शेलार बोलत होते.

'कनेक्टिंग लिंक'वर काम करण्याची गरज : मराठी चित्रपटांमध्ये दर्जा, गुणवत्ता, नावीन्य आणि अभिनयाची कोणतीही कमतरता नाही. मात्र चित्रपटाचे व्यावसायिक यश मिळवण्यासाठी निर्मितीबरोबरच स्क्रीन, वितरण व्यवस्था आणि प्रेक्षकवर्ग यांचा सखोल अभ्यास करण्याची गरज आहे, असे अॅड.शेलार यांनी सांगितले. ते म्हणाले, मराठी चित्रपटांमध्ये गुणवत्ता आणि नावीन्य ठासून भरले आहे. मात्र निर्मितीइतकाच स्क्रीन, वितरण आणि प्रेक्षकवर्ग यांचाही अभ्यास आवश्यक आहे.

यासाठी व्यवहार्य मॉडेल तयार झाल्यास महाराष्ट्र शासन त्यात गुंतवणूकदार म्हणून भूमिका घेईल. मराठी चित्रपटांना जेनझीशी जोडण्याचा प्रयत्न :आजच्या तरुण प्रेक्षकांचा मनोरंजनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन मोठ्या प्रमाणात बदलला आहे.

जाहीर नोटीस

## तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

क्र.प्रस्तु-१/कावी-३४७/२५-२६ दि.१५/०७/२६

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **जुबेदाबी शेख युसुफ, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **मुलगी नामे फरहीन अंजुम शेख यूसुफ, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०८/०५/२००५** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ अॅक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१५/०७/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार
वरुड**

# पालकमंत्रिपदाचा तिढा सुटला! भरत गोगावले रायगडचे पालकमंत्री

## गिरीश महाजनांकडे नाशिकची धुरा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)





**मुंबई** – तब्बल १९ महिन्यांच्या दीर्घ प्रतीक्षेनंतर रायगड जिल्हा पालकमंत्रीपदाची माळ रोजगार हमी योजना मंत्री भरत गोगावले यांच्या गळ्यात पडली आहे, तर नाशिकच्या पालकमंत्रीपदी अपेक्षेप्रमाणे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांची नियुक्ती झाली आहे. सामान्य प्रशासन विभागाने सोमवारी नाशिक आणि रायगड जिल्हा पालकमंत्र्यांच्या नियुक्तीचा आदेश जारी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळाचे खातेवाटप झाल्यानंतर जानेवारी २०२५ मध्ये पालकमंत्र्यांची नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार राष्ट्रवादी अजित पवार गटाला रायगड तर भाजपला नाशिकचे पालकमंत्रिपद मिळाले होते. मात्र, शिवसेना शिंदे गटाने रायगड पालकमंत्रिपदाचा मुद्दा प्रतिष्ठेचा केल्यानंतर अजित पवार गटाने नाशिक पालकमंत्रिपदावर दावा केला. त्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दोन्ही जिल्ह्याच्या पालकमंत्री नेमणुकीला पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली होती.

जानेवारी २०२५ पासूनच्या स्थगितीवर आज निर्णय झाला. नुकत्याच पार पडलेल्या विधान परिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाने रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या बदल्यात रायगड जिल्हा पालकमंत्रिपदावरील दावा सोडला होता. या निवडणुकीत राष्ट्रवादीचे अनिकेत तटकरे निवडून आल्यानंतर शिंदे गटाला रायगड पालकमंत्रिपद मिळण्याचा मार्ग मोकळा झाला.

# नथुराम गोडसे, गोपाळ गोडसे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सक्रिय सदस्य होते : सात्यकी सावरकरांची न्यायालयात कबुली

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**पुणे** – नथुराम गोडसे आणि गोपाळ गोडसे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सक्रिय सदस्य होते, अशी कबुली सावरकरांचे आणि गोडसेंचे नातू असलेल्या सात्यकी सावरकर यांनी पुण्यातील न्यायालयात दिली आहे.

सात्यकी सावरकर यांनी काँग्रेस नेते राहुल गांधींच्या विरोधात दाखल केलेल्या बदनामीच्या खटल्याची सुनावणी पुण्यातील विशेष न्यायालयात सुरु आहे. या सुनावणीदरम्यान राहुल गांधींचे वकील मिलिंद पवार यांनी सात्यकी सावरकर यांची उलटतपासणी घेतली. या दरम्यान वकील मिलिंद पवार यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना सात्यकी सावरकर यांनी नथुराम गोडसे आणि गोपाळ गोडसे हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सक्रिय सदस्य होते, असे सांगितले. गोपाळ गोडसे हे सात्यकी सावरकर यांची आई हिमानी सावरकर यांचे वडील होते.

सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधींविरोधात पुण्यात फौजदारी मानहानीचा खटला दाखल केला आहे. हा खटला राहुल गांधी यांच्या ५ मार्च २०२३ रोजी लंडनमध्ये केलेल्या भाषणातील स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या बाबतच्या कथित आक्षेपार्ह वक्तव्यांशी संबंधित आहे. या खटल्याची गेल्या महिन्यातही सुनावणी झाली होती. त्यावेळीही सात्यकी सावरकर यांनी राहुल गांधी यांनी सावरकरांबाबत केलेल्या दाव्यांचे खंडन केले होते. सावरकरांनी कधीही ब्रिटीशांशी तडजोड केली नाही. उलट सावरकरांची संपत्ती, घर, वाडी हे सर्व ब्रिटीशांनी जप्त केले होते, असे सात्यकी सावरकर यांनी म्हटले होते.




# ‘मराठी भक्तीची भाषा, अमराठी बांधवांनी मराठी स्वीकारुन सांस्कृतिक एकात्मतेचा आदर्श घालून दिला’

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**ठाणे** – मराठी ही सत्तेची नव्हे तर भक्तीची भाषा असून, अमराठी बांधवांनी स्वेच्छेने मराठी स्वीकारणे ही महाराष्ट्राच्या सांस्कृतिक एकात्मतेची ताकद असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले. महाराष्ट्र शासनाचा परिवहन विभाग, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई मराठी साहित्य संघ आणि कोकण मराठी साहित्य परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी भाषा पाठ्यक्रम अभियान’ सांगता समारंभात ते बोलत होते. हा समारोप नसून मराठी अभिमानाची धडाकेबाज सुरुवात आहे. महाराष्ट्र माझा, मराठी माझी संवादभाषा हा महाराष्ट्राचा जयघोष असून, मराठीची भक्ती महाराष्ट्राला जोडणारी शक्ती आहे, असेही ते म्हणाले.

यंदाच्या वर्षी १०५ दिवस चाललेल्या अभियानातून १.२५ लाख रिक्षा-टॅक्सी चालकांनी मराठी शिकून परीक्षा उत्तीर्ण केली. या सर्वांना प्रमाणपत्रे देण्यात आली. लाभले आम्हास सौभाग्य बोलतो मराठी: या ओळी उद्धृत करत उपमुख्यमंत्री शिंदेंनी मराठी ही अस्मिता, स्वाभिमान आणि मायबोली असल्याचे सांगितले. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी कायद्याचा बडगा न दाखवता प्रेमाने भाषा शिकविण्याचा मार्ग स्वीकारल्याचे कौतुक करत, कायद्याने नाही, प्रेमाने भाषा शिकते, असे शिंदे म्हणाले आहे.

# ‘आमचे मृतदेह घेऊन जा’, कुलाबा सामूहिक मृत्यू प्रकरणात नवे खुलासे

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**मुंबई** – मुंबईतील कुलाबा येथील नेव्ही नगरमधील सामूहिक मृत्यू प्रकरणाच्या तपासात नवनवीन माहिती समोर येत आहे. या घटनेचा तपास पुढे जात असताना फॉरेन्सिक आणि वैद्यकीय तपासातून काही महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले आहेत. या प्रकरणात नौदल अधिकारी पूरणमल मेहरा, त्यांची पत्नी ओमा आणि दोन मुलांचा मृत्यू झाला होता. मुंबईतील या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली होती.

धक्कादायक खुलासे तपासातील प्राथमिक माहितीनुसार, पूरणमल यांनी पत्नी ओमा आणि धाकटा मुलगा दर्श यांचा गुदमरवून जीव घेतल्याचा संशय आहे. या तिघांच्या मृत्यूनंतर पूरणमल यांनी स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे प्राथमिक तपासातून स्पष्ट होत असल्याचे सांगण्यात येत आहे. वडिलांना तो मेसेज पाठवला अन १५ ऑगस्ट रोजी घटना उघडकीस येण्यापूर्वी पूरणमल यांनी मध्यरात्री आपल्या वडिलांना व्हॉट्सअॅपवर संदेश पाठवल्याची माहिती समोर आली आहे.

## मध्य प्रदेशात भीषण अपघात

# मजुरांच्या वाहनाला ट्रकची धडक, ८ जणांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**ग्वाल्हेर** – मध्यप्रदेशातील ग्वाल्हेरजवळ राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ७९ वर मध्यरात्री भीषण अपघात झाला. मजुरांना घेऊन जाणाऱ्या लोडिंग वाहनाला समोरून येणाऱ्या भरधाव ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात ८ मजुरांचा मृत्यू झाला असून २५ हून अधिक जण गंभीर जखमी झाल्याची माहिती आहे. अपघातानंतर महामार्गावर काही काळ मोठी गर्दी आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले.

मिळालेल्या माहितीनुसार, हे सर्व मजूर उत्तर प्रदेशातील रहिवासी होते. ते मध्य प्रदेशातील डबरा परिसरातील चनूर भागात भात लागवडीच्या कामासाठी आले होते. दिवसभराचे काम संपल्यानंतर मध्यरात्रीच्या सुमारास ते लोडिंग वाहनातून परतत होते. चिन्का परिसरात पोहोचले असताना समोरून आलेल्या ट्रकने त्यांच्या वाहनाला जोरदार धडक दिली. धडक इतकी जोरदार होती की मजुरांचे वाहन रस्त्यावर उलटले. या दुर्घटनेत अनेक जण वाहनात अडकले होते. अपघाताची माहिती मिळताच पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना वाहनातून बाहेर काढून रुग्णवाहिकांच्या मदतीने ग्वाल्हेरमधील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.

# जनगणनेतील ओबीसींच्या कॉलमच्या मुद्यावर काँग्रेस आक्रमक, राहुल गांधींच्या उपस्थितीत बैठक

## ३०० जिल्हा प्रमुखांची दिल्लीत बैठक

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – जनगणनेचा दुसरा टप्पा सुरु झाला आहे. जनगणनेत विचारल्या जाणाऱ्या ४० प्रश्नांमध्ये जाती संदर्भातील प्रश्नाच्या तिथे एससी आणि एसटी प्रवर्गाचा उल्लेख आहे. मात्र, ओबीसी प्रवर्ग असा स्वतंत्र कॉलम नसल्यानं ओबीसी संघटनांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत. आता काँग्रेसनं याच मुद्यावर मोठं अभियान सुरु करण्याची तयारी सुरु केली आहे. काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या उपस्थितीत काँग्रेसच्या ओबीसी विभागाची महत्त्वाची बैठक बोलावण्यात आली आहे. ही बैठक १८ ऑगस्टला होण्याची शक्यता आहे. काँग्रेसकडून आयोजित केल्या जाणाऱ्या बैठकीला ओबीसी विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल जय हिंद यांच्यासह ७ राज्यामधील ३०० जिल्ह्यांमधील ओबीसी सेलचे जिल्हाध्यक्ष सहभागी होतील. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, हरियाणा, नवी दिल्ली आणि राजस्थान या सारख्या निवडणूक असलेल्या राज्यांमधील ओबीसी पदाधिकारी बैठकीत सहभागी होतील. काँग्रेसच्या ओबीसी आघाडीतील महिला विंगच्या सर्व पदाधिकाऱ्यांना देखील बोलावण्यात आलं आहे.

काँग्रेस सूत्रांच्या माहितीनुसार बैठकीत जनगणनेत ओबीसी कॉलम नसल्याच्या मुद्याव आगामी काळात निवडणूक असलेल्या राज्यांमध्ये प्रामुख्यानं उचलण्याबाबत चर्चा होईल. पार्टी या मुद्याला मागासवर्गीय समाजाचा अधिकार, प्रतिनिधीत्व आणि सामाजिक न्याय या मुद्यांना जोडून जनतेत जाण्याची तयारी करत आहे.

# मंत्रालयातील चेहरा पडताळणी यंत्रणेचा बोजवारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## ४१ कोटी रुपयांच्या खर्चावर प्रश्नचिन्ह



**मुंबई** – राज्याच्या प्रशासकीय कारभाराचे मुख्य केंद्र असलेल्या मंत्रालयातील वाढत्या गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी चेहरा पडताळणी यंत्रणा (फेशिअल रेकग्निशन सिस्टिम) बसवण्यात आली. मात्र, गेल्या दीड वर्षात या यंत्रणेचा बोजवारा उडाल्याचे चित्र आहे.

मंत्रालयातील एका प्रवेशाच्या ठिकाणी एक फेस स्कॅनरच तुटला आहे, तर मंत्रालय पोलीस नियंत्रण कक्षाच्या बाहेरील ही यंत्रणा नादुरुस्त झाल्यामुळे त्याचे फ्लॅप सताड उघडे आहे, तर गर्दीच्या वेळी यंत्रणा कोलमडत असल्याने ही यंत्रणा बसवण्यासाठी झालेल्या ४१ कोटी रुपयांच्या खर्चावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मंत्रालयात कामासाठी येणाऱ्या नागरिकांची गर्दी दिवसेंदिवस वाढत आहे. मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी तर पाच हजारांपेक्षा अधिक अभ्यंगत मंत्रालयात येतात. त्यामुळे सुरक्षा यंत्रणेवर मोठा ताण येतो. मंत्रिमंडळ बैठकीच्या दिवशी मंत्रालयाच्या सहाव्या मजल्यावरील मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या दालनाबाहेर नागरिकांच्या रांगा लागतात. पहिल्या मजल्यावरील महसूल मंत्र्यांच्या दालनापुढेही नागरिकांची गर्दी होते. या वाढत्या गर्दीवर नियंत्रण आणण्यासाठी गेल्या वर्षीच्या जानेवारी महिन्यात मंत्रालयाच्या सर्व प्रवेशद्वारावर चेहरा पडताळणी यंत्रणा बसवण्यात आली. व्हिजिटर्सना आरएफआयडी कार्ड देऊनच प्रवेश दिला जातो. परंतु, गेल्या काही दिवसांपासून या यंत्रणेत बिघाड होऊ लागले आहेत. आरसा गेटवरून फेस स्कॅनिग करून मंत्रालय इमारतीमध्ये प्रवेश करताना पुन्हा एकदा फेस स्कॅनिंग करावे लागते. पण येथील फेस स्कॅनर गेल्या अनेक दिवसांपासून बंद आहे.

यंत्रणा कुचकामी

मंत्रालय इमारत सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याने मंत्रालय परिसरात एकात्मिक सुरक्षा प्रकल्प राबवण्यात आला. या प्रकल्पाचे काम आणि वार्षिक देखभाल करण्यासाठी तब्बल ४१ कोटी ७५ लाख ५ हजार ६३४ रुपयांच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे. पण तरीही चेहरा पडताळणी यंत्रणा कुचकामी ठरल्याचे दिसत आहे.




